REVIEW OF RESEARCH

# गेर मांगेरो : लोकगीत

डॉ. राजाराम राठोड

मराठी विभाग,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## प्रस्तावना

मराठी लोकगीतातील, मराठी मातीतील लोकगीताचं समृध्द दालन भटक्या जमातीतील लोकगीताच्या रुपाने उपलब्ध आहे. मराठी लोकसंस्कृती विविधतेने नटलेली आहे. ग्राम संस्कृती, नागर संस्कृती यांचा परिचय सर्वांना आहे. पण गावकुसाबाहेर हजारो वर्षापासून भटक्या अवस्थेत राहणारा एक मानव समूह आजही उपेक्षेचे जगणे जगत आहे. त्यांना गाव नाही की स्वतःची जमीन नाही. स्वतःचे हात, स्वतःचे श्रम हीच त्यांची संपत्ती आहे. कष्टाच्या गराड्यात आयुष्य व्यतीत करणारा भटका समूह आगळीवेगळी सांस्कृतिक ओळख राखून आहे. भटक्या समूहातील काही जमाती गेल्या शतकभरात जमेल तसं, मिळेल तिथे स्थायिक होण्याचा प्रयत्न करत आहे. भटक्या स्वरुपातील या जमातीत विमुक्त भटके हा जास्त उपेक्षेचा धनी आहे. जन्मजात गुन्हेगारी शिक्का उरी कपाळी घेऊन तो आला दिवस पुढे ढकलत जगत आहे. समाज व्यवस्थेत या जमातीकडे गुन्हेगार म्हणून बघितले जाते. त्यामुळे त्यांना कोणी जवळही करत नाही व कोणी कामही देत नाहीत. शिक्षणापासून अजूनही ते कोसो दूर आहेत. पारधी अशी ही स्वातंर्त्यानंतर ६३ वर्षानंतर ही उपेक्षित असलेली जमात त्यांची अशी वेगळी संस्कृती आहे. त्यांचे जगण्याचे आपले रितीरीवाज आहेत. त्यांची आगळी—वेगळी लोकगीते आहेत. त्यांचे संशोधन होणे गरजेचे आहे.

## लेंगी लोकगीते

होळी हा सण अनेक अर्थांनी लमाण—बंजारा समूहास प्रिय आहे. 'होळी खेळणे' हा त्यांचा स्थायीभाव असतो. 'धुळवडीला' रंग खेळण्याची परंपरा मराठी मनास ताजेपणा देणारी असते. पण लमाण समूहात होळी खेळली जाते. होळी खेळताना हलगीच्या तालावर फेर धरुन नृत्य केले जाते. या नृत्यात दोन गट असतात. पहिला गट किंवा प्रमुख लेंगीगीताची सुरुवात करतो. त्या ओळी दुसरा गट आळवतो. लेंगी म्हणण्याची खास शैली आहे. त्याची अशी अस्सल सुरावट असते. त्यात गाणारे व ऐकणारे आनंदात तुडुंब होतात. जगण्याची अस्सल झिंग लेंगी लोकगीतातून व्यक्त होत जाते. साधारणपणे दिवाळी सणानंतर लेंगी म्हणण्याची परंपरा आहे. दिवाळीनंतर लमाण गणास होळीचे वेध लागतात.

लेंगी ही सुगीची गीते होत. श्रमगीताचे स्वरुप लेंगीला प्राप्त होते. कष्टाची कामे करताना समूहाने तथा एकएकटयाने लेंगी गीत गायले जाते. पण लेंगीला अस्सल रंग येतो तो होळीच्या दिवशी. त्याही पेक्षा दुप्पट जोमाने लेंगी उधानून येते. ती 'धूंड' या विधीच्या निमित्ताने. 'धूंड' हा मूल जन्माचा उत्सव होय. याठिकाणी होळी व 'धूंड' याप्रसंगी म्हटल्या गेलेल्या 'लेंगी' लोकगीताचे रुप—स्वरुप न्याहाळण्याचा प्रयत्न केला आहे.

'आवो भाई डाये सांळें
खेला रं होळी

आवो भाई डाये सांळें
खेला रं होळी

होळी रमलो
भाई भाई रं

होळी रमलो
भाई भाई रं'१

( अर्थ : तांडयातील वरिष्ठांनो या, आपण होळी खेळूया. बंधूनो होळी खेळूया. )

होळी खेळण्याचा प्रारंभ अशाप्रकारे केला जातो. लेंगीची पार्श्वभूमी तयार केली जाते. व लोकसमूहास लेंगी लोकगीते सूचत जातात. होळी लेंगी म्हणणाऱ्या पुरुषास 'गेरीया' म्हणतात. तर स्त्रीस 'गेरंळीं' म्हणतात. गेरीया व गेरंळीं यांची लोकगीताची जुगलबंदी 'धूंड'च्या निमित्ताने लागते. होळीचा शेवट गेर मागून केला जातो. त्यावेळी गीते गायली जातात. ती सामूहिक असतात. त्यात स्त्रिया आणि पुरुष यांची गीते वेगवेगळी आहेत.

## गेर मांगेरो : लोकगीत

लेंगी या लोकगीतातीलच एक उपप्रकार म्हणजे गेर मागणे लोकगीत होय. 'गेर मागणे' म्हणजे होळी साजरी केल्यानंतर दुसऱ्या दिवशी नगरातील ६ तांडयातील घरोघरी जाऊन 'काही रुपये' देणगी दाखल घेणे. हा रुपये घेण्याचा अधिकार परंपरागत आहे. हा रुपये मागण्याचा प्रकार भीक मागण्यासारखा नाही. गेरीया घरोघरी जातात, गेरणी घरोघरी जातात व गेर मागतात. हा महसूलाचा प्रकार असेल. किंवा होळीच्या निमित्ताने आम्ही परंपरेने लोकगीते गायली. त्याचे श्रममूल्य म्हणून तुम्ही काही देणे लागता ही भावना गेर मागण्यासाठी असते. साधारणपणे गेर मागून जमलेल्या रुपयाचे बोकुड घेऊन सर्वजण सामूहिक मांसाहारी जेवण करतात. याप्रसंगी मद्यपान करण्याची परंपराही आहे. स्त्रिया मात्र जमा झालेला गेर आपसात वाटून घेतात. पुरुष सामूहिक मांसाहार व मद्यपान करतात.

गेर मागतानाचे स्त्रीगीत –

'खुशी द रे खुशाले ती
गांड मार रे
बदिया मसाले ती

कांई नीली हुबी
खुशाले ती
गांड मार रे
बदिया मसाले ती

हिंड मुंड हिंड मुंड
नोड दड चाळा
तिरगी बरुजी ला
तू चाळा
तिरगी बरुजी ला'२

(अर्थ : खुशीने आनंदाने तू गेर दे. पैशाला अनेक वाटा असतात. त्यामुळे पैशाकडे बघू नको. खुशीने काय द्यायचे ते दे. )

उपरोक्त लोकगीतातील तिसरे कडवे कन्नड भाषेतील असावे. त्याचा अर्थ मला उमजला नाही. पण भविष्यात एखाद्या लोकसाहित्य अभयासकाला ते उपयोगी पडू शकते. त्यामुळे जसे मी ऐकले तसे देण्याचा प्रयत्न याठिकाणी करण्यात आला आहे.

लोकगीताचे किती रंग आणि किती ढंग असतात. याची अनुभूती लमाण जमातीतील लोकगीत संकलनाच्या निमित्ताने आली. गेर देण्यासाठी देणाऱ्याकडून उशीर झाला तर लगेच चाल बदलून मागणीचा रेटा सुरु असतो. या रेटयातून जास्तीत जास्त रक्कम घेण्याचा आग्रह असतो. जास्त रक्कम नाही मिळाली तरी समाधान व्यक्त केले जाते.

'खुशी द रे खुशी द
वेंडे रा चोद्या खुशी द

पाचच द रे पचासच द
वेंडे रा चोद्या पचासच द

मोटो छी र मोटो छी
वेंडे रा चोद्या मोटो छी

कोनी माना र कोनी माना
वेंडे रा चोद्या कोनी माना

बिडू दिला रे बिडू दिला
वेंडे रा चोद्या बिडू दिला

चब चब बोले चबुकला रे
छोरा गीरमलीया सो

तारो घर कतेसी रे
तारी काडू बतीसी

तारो झुपडा कतेसी रे
तारी काडू बतीसी

बिडू दिला रे बिडू दिला
वेंडे रा चोद्या बिडू दिला

हिंद मुंद हिंद मुंद
नोडदड चाळा

तिरगी बरुजी ला
घुसाळा तिरगी बरुजी ला'३

(अर्थ : खुशीने दे र, खुशीन दे. वेडया जे द्यायचे असेल ते खुशीने दे.

पाच रुपये दे नाही तर पन्नास रुपये दे. वेडया पन्नास रुपये दे.
तू श्रीमंत आहेस. वेडया तू श्रीमंत आहेस. त्यामुळे कमी रक्कम घेण्यास आम्ही तयार होणार नाहीत.
(पैसे पटकन देत नाहीत म्हटल्यावर मागणी वाढत जाते. )
पानाचा विडा घेऊन दे. वेडया पानाचा विडा घेऊन दे.
(पैसे देण्यावरुन काही वाकडं तिकडं बोलला तर त्याची खैर नसते. )
चब चब चबुकल्यासारखं (बोलघेवडा) काय बोलतोस. वेडया.
तुझे घर कुठशी (कुठे), तुझी पाडते बत्तीशी. (आणखीन चिडवण्यासाठी)
तुझी झोपडी कुठशी (कुठे), तुझी पाडते बत्तीशी. वेडया खुशीने दे. )

एवढं सगळं झाल्यानंतर ही अपेक्षित रक्कम मिळत नसल्यास लोकगीतातून मागणी वाढते.

'रपीया पचीस दर तू
मोर बाई मोरला मोर र तू'४

(अर्थ : रुपये पंचवीस दे र तू. तू मोरातला मोर आहेस. )

गेर मिळतो. अपेक्षित रक्कम मिळते. ती रक्कम देणाऱ्यास लोकगीतातून आशीर्वाद दिला जातो. हा आशीर्वाद त्याने दिलेल्या रक्कमेपेक्षा किती तरी मोठा असतो. त्या आशीर्वादात देणाऱ्याचे ऋण फिटते. पैसे देणाऱ्यास कन्हैया म्हटलेले पुढील लोकगीतातून दिसते.

गेरे मागणे याचा शेवट अशाप्रकारे होतो. गेरणीची गेर मागण्याची ही पध्दत गीत संकलनाच्या निमित्ताने प्रस्तुत संशोधकास ध्वनीमुद्रीत करता आली. गेरीयाही थोडया फार फरकाने अशाच प्रकारे गेर मागतात. ज्याच्या जवळ गेर मागायचे त्याच्या घरासमोर फेर धरुन लेंगी गीत गातात. गेर किंवा महसूल घेतल्यानंतर गेरणींनी दिलेला आशीर्वाद पुढील लोकगीतातून व्यक्त होताना दिसतो.

'हां हां कनैया
तारो आचो व्हिय रे

हां हां कनैया
तोन गरुजी दिय रे

हां हां कनैया
खिलऱ्या खाडू भांदिस रे

हां हां कनैया
जोड बंधी बांधीस रे

हां हां कनैया
तारो आचो व्हिय रे

हां हां कनैया
तोन बेटा दिय रे'५

(अर्थ : हो हो कन्हैया, तुझे चांगले होईल. तुला गुरुजी भरभरुन देईल. तुझ्या घरी खिल्लारी बैल बांधशील. दुमजली घर बांधशील. तुला मुलं–बाळ होतील. )

एवढा मोठा आशीर्वाद दिल्यानंतर गेरणी, गेरीयाचा समूह पुढील घरी जातो.

धूंडच्या निमित्ताने श्रीकृष्णाच्या रासक्रीडेची आठवण येते. ती स्त्रीयांची मुक्तता बंजारा–लमाण लोकगीतातून दिसून येते. लोकगीतातून व्यक्त होणारे स्त्री स्वातंत्र्य लमाणात विकसित अशी मातृसत्ताक कुटुंबपध्दती होती याचा पुरावाच आहे. लमाणात ऐंशीच्या दशकापर्यंत हुंडा घेण्याची पध्दत नव्हती. उलट वरपक्षाकडून वधूपक्षाला बैलाच्या रुपात हुंडा देण्याची पध्दत होती. आधुनिकीकरणाने बंजारा–लमाणांच्या संस्कृतीत बदल होत आहे. लमाण–तरुण शिकायला लागला. तो नागर झाला. शहरी बाबू झाला. बाहेरुन तो पांढरपेशा विकसित वाटू लागला. पण तो हुंडा घेऊ लागला. आता त्याच्या विकसितपणावरच प्रश्नचिन्ह उभे केले पाहिजेत. लमाण जमातीचा किंबहुना भटक्या जमातीच्या समृध्द संस्कृतीचा शोध घेतला पाहिजे.

गेरणीचे होळी दर्शन झाल्यानंतर गेरीया सुध्दा सात फेरे होळीभोवती श्रध्दाभावाने फिरतो. पुढील लोकगीत म्हणतो. –

'होळी रे मारी बंबड भोळी
भर गेरीया रं झोळी ये

होळी रे मारी होळी रे
भर गेरीया रं झोळी ये'६

(अर्थ : होळी माता तुला विनंती की तू गेरीयाची झोळी भर. )

होळी भोवती सात फेरे झाल्यानंतर लहानथोर एकमेकांचे चरण स्पर्श करुन नमस्कार करतात. त्यानंतर होळीचा संदेश दिला जातो. प्रमुख पंच (नसाबी) मध्यवर्ती ठिकाणी उभे राहून तांडयातील गेरीया व गेरणीस होळीच्या निमित्ताने चार दिवसात कोणी कोणाला काही बोलले असल्यास विसरुन जाण्याचे आवाहन करतो. आपला राग, द्वेष या होळीत फेकून देण्याविषयी विनंती करतो. तांडयातील एकजूटीचे आवाहन करतो. दुसऱ्या दिवशी बोकूड बळी देऊन मासांहार करण्याविषयीचे नियोजन सांगतो व बैठक समाप्त होते.

लोकगीतातून होणारा समूह मनाचा सांस्कृतिक आविष्कार विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. या लोकगीताचे रुप–स्वरुप न्याहाळण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात यात काही दोष राहिले असण्याची शक्यता आहे. ते माझे आहे. जे चांगले आहे ते लोकगीत गायकांचे आहे.

## संदर्भ


१. अशोक गंगाराम राठोड व समूह, करेल, भटरगी तांडा ता. जि. विजापूर
२. सौ. अणुबाई हिरासिंग राठोड व समूह, जानशी, मसिबीनाळ तांडा ता. जि. विजापूर
३. सौ. सुनिता बाळू राठोड व समूह, मोगरे–राजवाडी, भरटगी तांडा नं. १ ता. जि. विजापूर
४. सौ. सुनिता बाळू राठोड व समूह, मोगरे–राजवाडी, भरटगी तांडा नं. १ ता. जि. विजापूर
५. सौ. सुनिता बाळू राठोड व समूह, मोगरे–राजवाडी, भरटगी तांडा नं. १ ता. जि. विजापूर
६. अशोक गंगाराम राठोड व समूह, करेल, भरटगी तांडा ता. जि. विजापूर